# प्रेस नोट

अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव
दि.१७.०५.२०२२

आलोसे श्री.राजेंद्र भास्करराव पाटील, वय–५५, व्यवसाय–नोकरी, मुख्याध्यापक कविवर्य श्री.ना.धो.महानोर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वडगांव ता.सोयगांव जि.औरंगाबाद रा.प्लॉट नं.२६, भगवती नगर, नवा मालेगांव रोड, चाळीसगांव ता.चाळीसगांव जि.जळगांव यांना १,०००/–रु. लाचेची मागणी करुन लाचेची रक्कम स्वीकारंताना लाचलुचपत प्रतिबंध विभाग,जळगांव यांची कारवाई.

| | | | |
|---|---|---|---|
| १ | घटक | :– | जळगांव |
| २ | गुन्हा नोंद कंमाक | :– | चाळीसगांव पो.स्टे. गु.र.नं. ०१८०/२०२२ |
| ३ | कलम | :– | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम–७ प्रमाणे... |
| ४ | आरोपीचे नांव व कार्यालय | :– | श्री.राजेंद्र भास्करराव पाटील, वय–५५, व्यवसाय–नोकरी, मुख्याध्यापक कविवर्य श्री.ना.धो.महानोर माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, वडगांव ता.सोयगांव जि.औरंगाबाद रा.प्लॉट नं.२६, भगवती नगर, नवा मालेगांव रोड, चाळीसगांव ता.चाळीसगांव जि.जळगांव<br>(शिक्षण विभाग) |
| ५ | मागणी केलेली लाचेची तारीख व रक्कम | :– | दि.१७/०५/२०२२<br>१,०००/–रु.लाचेची मागणी |
| ६ | स्विकारलेली लाचेची रक्कम | :– | १,०००/–रु. |
| ७ | गुन्हा दाखल तारीख | :– | दि.१७/०५/२०२२ |
| ८ | थोडक्यात माहीती | :– | यातील तक्रारदार यांचा मुलगा श्रीकांत यांचे इयत्ता १२ वीच्या उच्च माध्यमिक परिक्षा गुणपत्रक प्रमाणपत्रावर व बोर्ड प्रमाणपत्रावर आईच्या नावाची चुकीने झालेली नोंद दुरुस्ती करुन मिळण्यासाठी आवश्यक ते कागदपत्र घेवुन दि. ०४/०३/२०२२ रोजी मुख्याध्यापक राजेंद्र पाटील यांची भेट घेतली असता त्यांनी तक्रारदार यांचा मुलगा यांचे उच्च माध्यमिक परिक्षा गुणपत्रक प्रमाणपत्रावर व बोर्ड प्रमाणपत्रावर आईच्या नावाची चुकीने झालेली नोंद विभागीय सचिव औरंगाबाद बोर्डाकडुन दुरुस्ती करुन आणुन देण्याकरीता तक्रारदार यांचेकडुन २,०००/–रुपये जागेवरच घेतले व ते काम लवकर करुन देतो असे सांगितले. परंतु एक महिना होवुन देखील मुख्याध्यापक यांनी तक्रारदार यांचे काम न केल्यामुळे तक्रारदार हे पुन्हा त्यांना दि.११/०५/२०२२ रोजी जावुन भेटले असता मुख्याध्यापक यांनी तक्रारदार यांचेकडे पुन्हा १,०००/–रुपये लाचेची मागणी केली बाबत तक्रारदार यांनी दि.१७/०५/२०२२ रोजी अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव कार्यालयात तक्रार दिली होती.<br>सदर तक्रारीची अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव पथकाने पंच साक्षीदारा समक्ष दि.१७.०५.२०२२ रोजी पडताळणी केली असता यातील आरोपी यांनी तक्रारदाराचा मुलगा यांचे उच्च माध्यमिक परिक्षा गुणपत्रक प्रमाणपत्रावर व बोर्ड प्रमाणपत्रावर आईच्या नावाची चुकीने झालेली नोंद विभागीय सचिव औरंगाबाद बोर्डाकडुन दुरुस्त करुन आणुन देण्याच्या मोबदल्यात १,०००/–रु.लाचेची मागणी केली व सदर लाचेची रक्कम आरोपी यांनी स्वतः वर नमुद वेळी व ठिकाणी स्विकारली म्हणुन गुन्हा. |

लचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरीकांना आवाहन करण्यात येते की, भ्रष्टाचारासंबधी काही माहीती असल्यास अगर लाच मागणाऱ्या लोकसेवकांबद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग जळगांव कार्यालयात संपर्क करावा.

**संपर्क पत्ता:**– अँन्टी करप्शन ब्युरो कार्यालय,जळगांव जिल्हाधिकारी कार्यालय परिसर,अल्पबचत भवन बिल्डींग,जळगांव.

**ईमेल आयडी:**– dyspacbjalgaon@gmail.com
**संकेतस्थळ:**– acbmaharastra.gov.in
**टोल फ्री कंमाक:**– १०६४
**दुरध्वनी कंमाक:**– ०२५७–२२३५४७७
**व्हॉटस्‌ॲप कंमाक:**– ८७६६४१२५२९

पोलीस उप अधिक्षक अँन्टी करप्शन ब्युरो, जळगांव

17.5.2022

**शशिकांत श्रीराम पाटील**
**पोलीस उप अधिक्षक**
**अँन्टी करप्शन ब्युरो,जळगांव**